नि.फौ.ख.क्र. ७४/२०१६
सरकार वि. विकास
नि.क. ७

**सरकार पक्षा तर्फे साक्षीदार क. १ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो/करते की,

माझे नाव : पुष्पा उमेश कारमोरे
वय : ४९ वर्षे, व्यवसाय : घरकाम,
राहणार : बुधवारी पेठ, तह उमरेड, जि नागपूर

.....................................

**सर तपास सरकारी अभियोक्ता श्री मसराम यांचे तर्फे**

मी आरोपीला ओळखतो. आरोपी माझया पतीचा लहान भाउ आहे. जख्मी उमेश कारेमोरे माझे पती आहे. घटना दि. २७.५.१६ रोजी रात्री ९ वाजता माझया घराच्या पुढे रोडवर, डेकाटे चौकात घडली होती. त्यादिवशी माझे पती कामावरुन ५ वाजता घरी परत आले. त्यानंतर परत ते बाहेर गेले. रात्री ९ ०.१५ वाजता मी घरी हजर असतांना गिरेवार नावाच्या इसमाने मला सांगितले की,माझे पती आणि त्यांच्या भावामध्ये भांडण सुरु आहे. म्हणुन मी लगेच रस्त्यावर गेली. तेव्हा मला माझे पती रस्त्यावर पडलेले दिसले आणि आरोपी त्यांच्या छातीवर बसुन आरोपी त्यांना चाकुने मारतांना दिसला. मी आरोपीला ओढण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी तो अलग झाला नाही आणि माझयाकडे डोळे काढुन बघु लागला. माझयाच्याने दोघा भावाला सोडवणे न झाल्याने मी घराकडे धावत आले आणि उमरेड पोलीस स्टेशनला फोन केला. त्यानंतर मी पुन्हा घटनास्थळी गेले तरी मला पुर्वीच्या स्थितीत दोघेही भाउ दिसले त्यामुळे मी पोलीस स्टेशनला येण्यासाठी निघाले. तेव्हा मला रस्त्यात पोलीस भेटले. मी पोलीसांच्या वाहनाने घटनास्थळी आले. पोलीसांनी दोन्ही भावांना अलग अलग केले. माझया पतीच्या दोन्ही हातांना, छातीच्या वर आणि खालच्या भागाला व तसेच मांडीवर रक्ताच्या जख्मा झालया होत्या. पोलीसांनी माझया पतीला ग्रामीण रुग्णालय उमरेडला नेले व आरोपींना पोलीस स्टेशनला नेले. मी सुद्धा पोलीस स्टेशनला गेले आणि घटनेची लेखी तक्रार दिली. आता मला दि. २७.५.१६ रोजीची **लेखी तकार** दाखवली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. मजकुर बरोबर आहे. तिला **नि.क.८** देण्यात येते. आता मला **छापिल एफ आय आर** दाखवला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. तो **नि.क. ९** वर आहे. पोलीसांनी माझे बयान घेतले होते. आज आरोपी न्यायालयात हजर आहे.

**वकील पुका-यावर गैरहजर.**
**उलट तपास आरोपी तर्फे : नाकारले.**

**फेर तपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले | समक्ष

(कु.व.रा.जांभुळे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, उमरेड
दि : १३.१२.२०१६

(कु.व.रा.जांभुळे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, उमरेड